खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र १

## विषय

## सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती

### प्रकरण १

### सहकार

# विषय- सहकार - सिद्धांत आणि कार्यपद्धती

## प्रकरण १ – सहकार

**अर्थ :**

'Co-operation' (सहकार) हा शब्द लॅटिन भाषेतील 'Co-operari' या शब्दापासून निर्माण झाला आहे. या लॅटिन शब्दाचा सामान्य अर्थ 'एकत्र काम करणे' असा आहे.सहकार या संज्ञेचा शब्दशः अर्थ परस्पर सहकार्य करणे, परस्परांना कामात मदत करणे किंवा सर्वांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करणे असा होतो. थोडक्यात सहकार ही लोकशाही, चारित्र्य, बंधुभाव, शांतता, न्याय आणि आर्थिक व सामाजिक प्रगती या अधिष्ठानावर आधारलेली अशी एक आदर्श समाजव्यवस्था होय की, जिच्यामध्ये समान निष्ठा असणारे लोक आपल्या कल्याणासाठी एकत्र येत असतात.

व्याख्या :

1) वैकुंठलाल मेहता :

"समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन, समान आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वेच्छेने तयार केलेले संघटन म्हणजे सहकार होय."

2) पी. एच. कॅसलमन :

"सामाजिक आशय असलेली अर्थपद्धती म्हणजे सहकार होय.'

## सहकाराचे स्वरूप

१) संघटनात्मक स्वरूप :

सहकार हा एक संघटन प्रकार म्हणून ओळखला जातो. सहकारी संस्था हे त्याचे स्वरूप आहे. व्यापार, उद्योग, सेवा उद्योग या उद्योगांसाठी सहकारी संस्था स्थापन करण्यात येतात. या संस्थांमध्ये पतपुरवठा संस्था, सहकारी बँका, ग्राहक सहकारी संस्था, खरेदी-विक्री महासंघ सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध व्यवसाय संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, कृषी विपणन संस्था अशा विविध संघटनांचा समावेश होतो.

२) आर्थिक स्वरूप :

राष्ट्रीय विकासाचे उत्तम साधन म्हणून सहकार तत्त्वाला ओळखण्यात येते. सर्वसामान्य लोकांच्या आर्थिक विकासाचे माध्यम म्हणून सहकार हे तत्त्व अतिशय महत्त्वाचे मानण्यात आलेले आहे. एक अर्थपद्धती, एक विचारप्रणाली आणि एक व्यापक चळवळ अशा तिन्ही रूपात सहकार आढळून येतो. ज्याप्रमाणे भांडवलशाही, साम्यवाद आणि समाजवाद या तीन अर्थप्रणाली आहेत, त्याचप्रमाणे सहकार ही एक अर्थपद्धती आहे.

३) वैचारिक स्वरूप :

सहकार या तत्त्वाचा वैचारिक आधार आहे. सहकार क्षेत्रातील विचारवंतांच्या मते, सहकाराला वैचारिक अधिष्ठान असून त्याच आधारावर सहकारी चळवळ सुरू आहे. सहकार चळवळीची, विचारप्रणालीची खास वैशिष्ट्ये व तत्त्वे आहेत. थोडक्यात, सहकाराचे तत्त्वज्ञान विशिष्ट अशा विचारप्रणालीवर,वैचारिक अधिष्ठानावर आधारित आहे.

४) शैक्षणिक स्वरूप :

सहकाराला आधुनिक काळात शैक्षणिक प्रसाराचे प्रभावी साधन समजले जाते. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर, आदिवासी, लहान व्यवसायातील कामगार, मागासवर्गीय, दुर्बल घटक, महिला यांना साक्षर, सुशिक्षित करण्याची क्षमता केवळ सहकारात आहे, असे वॅटकिन्सन यांनी व्यक्त केलेले आहे. सहकाराचा विस्तार झाल्यामुळे प्रौढ शिक्षण कार्यक्रमालादेखील चालना मिळालेली आहे.

५) सामाजिक स्वरूप :

समाजाच्या सर्वांगीण विकासाचे सर्वोत्तम साधन म्हणून सहकाराकडे पाहण्यात यते, सहकार तज्ज्ञांच्या मते सहकार ही आर्थिक चळवळ नसून एक सामाजिक चळवळ आहे. कारण 'सहकार' हा मुळातच सामाजिक गरजेतून उदयाला आलेला आहे. समाजप्रबोधन आणि समाजाचा विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी सहकार या तत्त्वाचा प्रसार होणे ही काळाची गरज आहे. सहकार चळवळीत सामाजिक परिवर्तन करण्याची क्षमता असून या चळवळीत धर्म, लिंग, जात, वास्तव्य, पंथ, विविध संप्रदाय असा कोणत्याही प्रकारचा भेद केला जात नाही.

## सहकाराची व्याप्ती

१) कृषी क्षेत्र :

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान असल्याने सहकाराचा सर्वात जास्त प्रसार कृषी क्षेत्रात झालेला आहे. सहकाराने कृषीक्षेत्र मोठ्या प्रमाणावर व्यापलेले आहे. शेतीसाठी पीक कर्ज, मध्यम व अल्प मुदतीची कर्जे, बी-बियाणे, खते, कीटकनाशके, जलसिंचन सुविधा, शेतमालाची वाहतूक आदी सुविधा पुरविण्यासाठी वेगवेगळ्या सहकारी तत्त्वावर आधारित कृषी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. भारतात कृषी क्षेत्रासाठी सहकार हे वरदान ठरले आहे.

२) उत्पादक प्रक्रिया क्षेत्र :

कृषीमालावर आधारित उत्पादन आणि प्रक्रिया करण्यासाठी अनेक सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. सहकार तत्त्वाचा आधार घेऊनच महाराष्ट्रात अनेक साखर कारखाने उभारण्यात

आलेले आहेत. सूतगिरण्या, तेलगिरण्या, दुध प्रक्रिया संघ, विणकर संस्था, खत कारखाने, कीटकनाशक निर्मिती, शेती उपयोगी साधने, भात गिरण्या अशा अनेक संस्था सहकारी तत्त्वावर निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

३) लघुउद्योग क्षेत्र :

सहकाराची व्याप्ती लघुउद्योग क्षेत्रातही आढळून येते. ग्रामीण उद्योग आणि लघुउद्योग क्षेत्रातही सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या असून, ग्रामीण व लघुउद्योगात पतपुरवठा करण्यासाठी सहकारी व नागरी सहकारी बँका स्थापन करण्यात आलेल्या आहेत. थोडक्यात, सहकार तत्त्वाचा प्रसार लघुउद्योग क्षेत्रातही झालेला असून या उद्योगांचा विकास करण्यासाठी अनेक सहकारी तत्त्वावरील संस्था स्थापण्यात आलेल्या आहेत.

४) बँकिग क्षेत्र :

ग्रामीण भागात जिल्हा सहकारी बँकांमार्फत 'सहकार' बँकिंग क्षेत्रात काम करताना दिसतो. सद्य:स्थितीचा विचार करता बँकिंग हे क्षेत्र सहकाराने काबीज केलेले आहे. विशेषत: मोठमोठ्या शहरात नागरी सहकारी बँका व्यापक प्रमाणात कार्य करीत आहेत.

५) नागरी क्षेत्र :

सहकार तत्त्वात बऱ्याच प्रमाणात नागरी क्षेत्र काबीज केलेले आहे. विशेषत: गृहनिर्माण, गृहतारण, सदनिका मालक सहकारी संस्था, पगारदार दर्जाच्या सहकारी संस्था नागरी पतसंस्था अशा विविध प्रकारच्या पतसंस्था सहकार तत्त्वाच्या आधारे स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

६) ग्राहक क्षेत्र:

ग्राहकांना जीवनावश्यक आणि गृहपयोगी वस्तू रास्त दरात मिळाव्यात, ग्राहकांचे शोषण होऊ नये या उद्देशाने ग्राहक सहकारी भांडारे स्थापन करण्यात आलेली आहेत. शेत अवजारे, पेट्रोल, डिझेल आदी वस्तूंची विक्री करण्यासाठी देखील सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. थोडक्यात, सहकार क्षेत्राने ग्राहक क्षेत्र देखील व्यापलेले आहे.

७) सेवा क्षेत्र :

ग्राहकांना विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठी विविध सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या असून पीक संरक्षण, पाणीपुरवठा, वाहतूक, साठवणूक, कृषीमाल खरेदी-विक्री संघ, बँकिंग आदी क्षेत्रात सहकाराने आपला प्रभाव पाडलेला आहे. थोडक्यात सेवा क्षेत्र देखील आज सहकार तत्त्वाने व्यापलेले आहे.

८) सहकार शिक्षण :

सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय व राज्य पातळीवर सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. सहकाराविषयी शिक्षण देण्यासाठी पुणे येथे 'वैकुंठ मेहता सहकारी

व्यवस्थापन संस्था' केंद्र शासनाने स्थापन केलेली असून महाराष्ट्रात राज्यशासनाने सहकाराचे प्रशिक्षण देण्यासाठी दोन महाविद्यालये व तेरा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना केलेली आहे.

## सहकाराची उद्दिष्टे

1.सामाजिक विकास घडवून आणणे :

समाजातील दुबळ्या आणि दुर्लक्षित लोकांना एकत्र आणून आणि त्यांना आर्थिक व नैतिक बळ प्राप्त करून देऊन त्यांचा सामाजिक विकास करणे हे सहकाराचे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. हे कार्य सहकारी क्षेत्रच करू शकते. सहकारी क्षेत्राद्वारे केल्या जाणाऱ्या या कामांना तोड नसते. समाजात ताकद निर्माण विकासाची प्रेरणा देण्याचे काम सहकार करते. त्यामुळे लोकांमध्ये स्वावलंबी जीवन जगण्याची स्फूर्ती मिळून त्यांच्या सामाजिक जीवनात फरक पडतो.

2.दुर्बल वर्गाच्या आर्थिक हिताचे रक्षण करणे :

समाजातील दुर्बल आणि तळागाळातील व्यक्ती सर्वार्थाने दुर्बल असतात. आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा त्यांना दुर्बल बनवत असतो. अशावेळी समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाच्या हिताचे रक्षण करण्याचे कार्य सहकार्य क्षेत्र करते. सहकारात सेवाभाव आणि सामाजिक हित या दोन्ही बाबींना महत्त्व दिले जात असल्याने त्यांच्याकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला जीवनावश्यक वस्तू वा सेवांचा पुरवठा केला जातो. या घटकांना व्यवसाय-रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातात.

३) मक्तेदारीपासून संरक्षण करणे :

मक्तेदारीमुळे खासगी क्षेत्रात नफाखोर वृत्ती वाढते. काळ्याबाजाराला चालना मिळते. यासारख्या प्रवृत्तींपासून समाजाचे रक्षण करणे हे सहकाराचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. सहकारात सेवा हेतूने कार्य केले जात असल्याने समाजाला वस्तू आणि सेवांचा नियमित व वाजवी भावात पुरवठा होतो. काळाबाजार आणि भाववाढ अथवा टंचाई यासारख्या प्रवृत्ती रोखल्या जातात.

४) मागणी व पुरवठ्यात समन्वय साधणे

सहकाराचे आणखी एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे मागणी व पुरवठ्यात समन्वय घडवून आणणे होय. त्यासाठी सहकारी संस्था स्वतः उत्पादन करतात किंवा उत्पादकाकडून मालाची खरेदी करतात. सहकारात कृत्रिम टंचाई, भेसळ, भाववाढ यासारख्या गोष्टींना स्थान नसते. त्यामुळे त्यांना मागणी आणि पुरवठ्यात समन्वय प्रस्थापित करता येतो.

५) एकसंध समाजाची निर्मिती करणे

सहकारामध्ये सर्व धर्म, पंथ, जात, भाषा, रंग, लिंग इत्यादी कोणत्याही प्रकारचे भेद न करता सर्वांना सामावून घेतले जाते त्यामुळे एकसंध समाजाची निर्मिती करणे शक्य होते. सहकारामुळे

व्यक्ती आपापसात असणारे भेद विसरतो. सर्वांना समान पातळीवर वागविणे हे सहकाराचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

६) खर्चावर नियंत्रण आणणे :

स्वतः मालाची निर्मिती करून ग्राहकोपयोगी मालाची खरेदी उत्पादकाकडून करून सहकारी संस्था विविध खर्चावर नियंत्रण आणण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. या संस्थांमुळे मध्यस्थांचे उच्चाटन होते त्यामुळे खर्च कमी होतो. वस्तूच्या वितरणाचाही खर्च कमी ठेवला जातो. सहकारी संस्थांचे व्यवस्थापनही सेवावृत्तीने चालत असल्याने खर्चात बचत होते. खर्च नियंत्रणाचे हे उद्दिष्ट जनतेच्या हिताचे आणि सहकारक्षेत्र विकासाला पोषक ठरते.

७) रोजगार निर्मिती करणे :

बेरोजगारी ही देशातील मोठी समस्या आहे. ही समस्या दूर करण्यासाठी रोजगार निर्मिती करणे हेही सहकाराचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे रोजगाराच्या संधीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होते. ग्रामीण आणि नागरी भागात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

## सहकाराची वैशिष्ट्ये

१) व्यक्तींचे संघटन

कोणत्याही सहकारी संघटनेत ज्या व्यक्ती एकत्र येतात त्या व्यक्ती म्हणूनच एकत्र येतात; भांडवलाचा पुरवठा करणारा घटक म्हणून एकत्र येत नाहीत. कोणत्या व्यक्तीने किती भांडवल आणले यावरून व्यक्तीचा दर्जा, संघटनेतील स्थान निश्चित होत नाही. सहकारी संस्थेत सर्व व्यक्ती समान पातळीवर असतात, आपले उद्दिष्ट साध्य व्हावे यासाठी एकमेकांना साहाय्य करीत असतात.

२) स्वेच्छेने निर्मिती :

सहकारी संस्थाचे सदस्य स्वत:हून आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आलेले असतात. लोकांनी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकत्र यावे यासाठी कोणत्याही अंतर्गत वा बाह्य घटकांचा दबाव नसतो. सहकारी संस्थांची स्थापना, स्वेच्छेने झालेली असल्याने या संस्थेत काम करणाऱ्या, सभासदत्व स्वीकारलेल्या व्यक्ती एकोप्याने काम करीत असतात.

३.आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्तींचा समूह :

सहकारी संस्थांची स्थापना आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्तीचे पुनरुत्थान व्हावे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्ती सबळ व्हाव्यात या उद्देशाने करण्यात येते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्ती पृथक राहून आपली उद्दिष्टे साध्य करू शकत नाहीत. अशा व्यक्तींकडे आर्थिक सामग्री तुटपुंजी असते. म्हणून सहकारी संस्थेच्या माध्यमातून संघटित असे सामर्थ्य तयार करण्यात येते.

**५. नफा मिळविणे हा उद्देश नाही :**

सहकारी संस्थांची उभारणी लोककल्याणासाठीच करण्यात आलेली असल्याने सेवाभावाला प्राधान्य देण्यात आलेले असते. सहकारी व्यावसायिक संघटनांचे नफा मिळविणे हे उद्दिष्ट नसते. एखादी विशिष्ट आर्थिक सेवा सदस्यांना उपलब्ध करून देणे हे सहकारी संस्थाचे उद्दिष्ट असते.

**५) नीतिमूल्यांना महत्त्व :**

सहकारी संस्थांच्या कार्यात नीतिमूल्यांना महत्त्व दिले जाते. सहकारी संस्थांमध्ये व्यावसायिक मूल्ये गौण मानली जातात. आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांची सांगड घालण्याचे कार्य सहकारी संस्था करतात. दुर्बल घटकांचे शोषण, भेसळ, साठेबाजी, खोटी वजनमापे, अवास्तव व्याज अशा गोष्टींना सहकारात थारा दिला जात नाही.

**६) समान दर्जा :**

सहकारी संस्थांच्या सदस्यांमध्ये कोणत्याही कारणाने भेदभाव केला जात नाही. सदस्याची सांपत्तिक स्थिती कशीही असो, सदस्य कोणत्याही जाती, धर्माचा असो, तिचा सामाजिक व राजकीय दर्जा कोणत्याही प्रकारचा असो, संघटनेतील व्यक्तीला इतरांप्रमाणेच अधिकार व दर्जा देण्यात येतो. जेव्हा सहकारी संस्थांच्या निवडणुका होतात तेव्हा प्रत्येक सदस्याला एक मत देण्याचा अधिकार देण्यात आलेला असतो. थोडक्यात, सर्व सदस्यांना समान दर्जा हे सहकाराचे स्वरूप आहे.

**७) समान उद्दिष्ट :**

सहकारी संस्थांचे समान उद्दिष्ट असते. कोणत्याही व्यक्तीला समुदायापासून पृथक राहून आपली गरजांची पूर्तता करता येणे शक्य नसते. सहकारी संस्थेच्या सदस्यांना आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी एकमेकांशी साहाय्य करण्याचे धोरण स्वीकारावेच लागते. थोडक्यात, उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी सहकार भावनेने एकत्र येणे हे सहकाराचे स्वरूप आहे.

**८) स्वावलंबन व ऐक्यभाव :**

सहकारी संस्थांचे सदस्य शक्य असेल तेथे स्वावलंबनाचा व ऐक्यभावनेच्या तत्त्वाचा तात्त्विक आणि व्यावहारिक स्वीकार करतात. स्वावलंबनाच्या माध्यमातून आपले उद्दिष्ट प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर सहकारी संस्थांमध्ये सेवाभावाने कार्य केले जाते. 'एकासाठी सर्व व सर्वांसाठी एक' हे सहकाराचे ब्रीदवाक्य आहे. या ब्रीदवाक्यातून सेवाभाव प्रतित होतो.

९) व्यक्तीपेक्षा समष्टीला महत्त्व :

सहकारात सामूहिक भावना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. वैयक्तिक स्वार्थाला सहकारात तिलांजली देण्यात येते. संपूर्ण समूहाचा फायदा व्हावा यासाठी सहकारी संस्थेतील सर्व सदस्य एकमेकांना सहकार्य करीत असतात. सामूहिक हित साधणे हे सहकाराचे स्वरूप आहे. थोडक्यात, सहकारात वैयक्तिक हितापेक्षा सामूहिक हिताला अग्रक्रम देण्यात येतो.

१०) सामाजिक परिवर्तन हे ध्येय :

'सहकार' ही मूलतः सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडवून आणण्यासाठी शोषणरहित आणि समतेवर आधारलेला नवा समाज निर्माण करणे हे सहकाराचे ध्येय असून, ते साध्य होण्यासाठी सहकारी संस्था ध्येय-धोरणे आखतात व अंमलात आणतात. आर्थिक व्यवहाराबरोबरच लोकशिक्षणाचे कार्य सहकारी संस्था करीत असतात.

## सहकाराची तत्त्वे

१) खुले व ऐच्छिक सभासदत्व :

सहकारी संस्थेमध्ये कोणत्याही व्यक्तीस ऐच्छिक सभासदत्व स्वीकारता येते. संस्थेचे सभासदत्व सर्वांना खुले असून जात, धर्म, पंथ, लिंग, वास्तव्य या घटकाच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीस सभासद होण्यापासून वंचित ठेवण्यात येत नाही. ऐच्छिक सभासदत्व म्हणजे सहकारी संस्था कोणत्याही व्यक्तीला सभासदत्व स्वीकारावे यासाठी सक्ती करू शकत नाही. खुले सभासदत्व म्हणजे पूर्णपणे स्वातंत्र्य असलेले सभासदत्व नाही. विशिष्ट संस्थेचे सभासद होण्यासाठी संस्थेच्या उद्दिष्टासारखे व्यक्तीचे उद्दिष्ट असावे लागते.

२) लोकशाही कारभार :

सहकारी संस्थेचा सर्व कारभार लोकशाही तत्त्वानुसार सुरू असतो. लोकशाहीत ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र, सार्वभौम असल्याचे मानण्यात येते त्याप्रमाणे सहकारी संस्थेचे सभासद असलेल्या व्यक्तींना आपले मत खुलेपणे मांडण्याची संधी देण्यात येते.ज्याप्रमाणे लोकशाहीत अंतिम सत्ता लोकांच्या हाती असते त्याचप्रमाणे सहकारी संस्थेचा कारभार सभासदांच्या मर्जीनुसार, इच्छेनुसार चालतो. सहकारी संस्थेत प्रत्येक व्यक्ती आपले मत मोकळेपणे व्यक्त करण्याचा अधिकार असतो.

३) भांडवलावर मर्यादित व्याज :

प्रत्येक सहकारी संस्थेचा भांडवल हा दुय्यम घटक असतो. म्हणून सभासदांनी व्यवसायात गुंतविलेल्या भांडवलावर अल्प दराने व्याज देण्यात यावे, असे रॉश्डेल समितीने सुचविले. त्याचा

तात्त्विक आणि व्यावहारिक स्वीकार सहकारी संस्थांनी केलेला आहे. भांडवल हेच वर्ग-कलहाचे व संघर्षाचे मूळ कारण आहे, असे मानून सहकारी संस्थांनी भांडवल या घटकाला दुय्यम दर्जा दिलेला आहे. थोडक्यात, भांडवलावर मर्यादित माफक व्याज हे सहकाराचे मूलभूत तत्त्व आहे.

४) लाभाचे समान वाटप :

सभासदांना सेवा देणे हा सहकारी संस्थेचा हेतू असतो. मात्र काही सहकारी संस्था काही प्रमाणात नफा मिळवित असतात. व्यवस्थापन खर्च विचारात घेऊन नफ्याचे प्रमाण किती असावे हे ठरविले जाते. सहकारी संस्थेने जो नफा मिळविलेला आहे त्याचे म्हणजे सहकारी संस्थेने मिळविलेल्या लाभाचे कशा प्रकारे वाटप करावे याचे मार्गदर्शन करण्यासाठी 'लाभाचे वाटप' या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला.

५) सभासदांच्या शिक्षणाचे तत्त्व :

सहकाराचे भवितव्य हे सहकाराच्या प्रसारावर आणि सहकाराचा प्रसार हा शिक्षणावर आधारित आहे. सहकारी संस्था आणि सहकारी चळवळ भक्कम होण्यासाठी सहकारी संस्थेतील सर्व सभासदांना व सर्व संबंधित घटकांना सहकाराचे शिक्षण दिले पाहिजे, सहकार म्हणजे काय ? याची माहिती करून दिली पाहिजे, असे या तत्त्वाद्वारे सुचविण्यात आलेले आहे. सहकारी संस्थेचा संपूर्ण कारभार व व्यवस्थापन कार्यक्षम रहावे, यासाठी सहकारी संस्थेच्या सदस्यांना शिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यातआली. रॉण्डेल प्रणेत्यांनी १८४४ मध्ये सभासदांना शिक्षण द्यावे या तत्त्वाचा पुरस्कार केला. एकूण नफ्यापैकी २.५% इतका नफा सहकाराचे शिक्षण देण्यासाठी राखीव निधी म्हणून ठेवण्याचा नियम केला.

६) सहकारांतर्गत सहकाराचे तत्त्व :

आतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने १९६६ साली सहकारांतर्गत सहकाराच्या तत्त्वाचा पुरस्कार केला. सहकारी क्षेत्रातील विभिन्न प्रकारच्या संस्थांमध्ये एकमेकांच्या विकासासाठी, वृद्धीसाठी, वाढीसाठी परस्पर सहकार्य व समन्वय प्रस्थापित करावा, असा या तत्त्वाचा आशय आहे. अशा प्रकारचे सहकार्य स्थानिक, जिल्हा, राष्ट्र, राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात यावे असेही या तत्त्वांद्वारे सांगण्यात आलेले आहे. सहकारांतर्गत सहकार या तत्त्वास 'विकासाचे तत्त्व' असेही संबोधले जाते.

## सहकार चळवळीची बलस्थाने (Strength)

१) सहकारी संस्थांच्या जाळ्यांमुळे ग्रामीण भागातील जनतेला तसेच शेतकऱ्यांना अल्प दरात कर्जपुरवठा होत असतो . त्यामुळे त्यांचा आर्थिक फायदा होतो .
२) सहकार चळवळीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे . आज प्रत्येक गावातील सोसायटी , पतसंस्था , नागरी पतसंस्था , सहकारी बँका , साखर कारखाने , दुध डेअरी , सूत गिरण्या , खरेदी विक्री संघ यामुळे लोकांना रोजगार मिळाला आहे .
३) सहकारी चळवळीच्या माध्यमातून अनेक भागात राजकीय नेतृत्व निर्माण झालेले आहे हे दिसून येते .
४) महाराष्ट्रामध्ये सहकारी पतसंस्था आघाडीवर काम करताना दिसत आहे .
५) ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती व सामाजिक परिस्थिती यात सहकारामुळे सकारात्मक परिवर्तन झाले आहे .
६) अद्यावत शेती तंत्र , बी - बियाणे , खते कमीत कमी दरात उपलब्ध होण्यासाठी सहकारी संस्था महत्वाची भूमिका बजावत आहे .
७) सहकारी चळवळीमुळे नैतिक मूल्ये वाढताना दिसत आहे .
८) राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी व बंधुभाव जोपासण्यासाठी सहकारी चळवळीची मदत होत आहे.
९) सहकारी संस्थांमुळे वस्तूंच्या वितरण खर्चात काटकसर होत आहे .
१०) आर्थिक विषमता दूर करण्यासाठी सहकारी चळवळ विशेष भूमिका बजावत आहे .

## सहकारी चळवळीतील दुर्बलता (Weakness)

१) १ ९ ०४ च्या सहकारी कायद्यानुसार विविध सहकारी संस्था या काळात स्थापन केला असे म्हणणे धाडसाचे ठरेल.
२) ए.डी.गोरवाला यांच्या सत्तेखालील समितीने १ ९ ५४ मध्ये ग्रामीण पतपुरवठा मंडळाच्या संदर्भात केलेल्या शिफारशीवर अंमलबजावणी न झाल्याने या शिफारशी कुचकामी ठरल्या.
३) आज महाराष्ट्रामध्ये निष्क्रिय सहकारी संस्थांची संख्या जवळजवळ ३५ ते ४० % आहे.
४) राज्यातील बहुतांशी सहकारी पतसंस्थांची आर्थिक प्रगती फारशी समाधानकारक नाही.
५) कर्ज पुरवठा व वसुली यांच्यात एकवाक्यतेचा अभाव दिसून येतो. उदा. सरकार घोषणा वेगळी करते व सहकारी संस्था (काही ठिकाणी) अंमलबजावणी वेगळीच करतात .
६) भारतातील सहकारी संस्थांकडे स्वतःच्या आर्थिक निधीची कमतरता आहे , हे वास्तव नाकारून चालणार नाही .
७) कर्जवसुलीचे प्रमाण अत्यल्प आहे. दिवसेंदिवस बिगर उत्पादक संपत्ती ( N.P.A. ) वाढत आहे.
८) सगळ्याच शेतकऱ्यांना गरजेनुसार व मागणीनुसार पतपुरवठा होतोच असे नाही .
९) काही सहकारी संस्थांमध्ये त्यांच्याच पदाधिकारी व अधिकारी वर्गाकडून अफरातफरीचे / लबाडीचे व्यवहार होताना दिसून आले आहे.

१०) कर्जाचा डोंगर डोक्यावर वाढतच असल्याने अनेक सरकारी संस्था आर्थिक कमकुवत बनत आहे.

११) जागतीकरण, उदारीकरण व खाजगीकरण यांचाही विपरीत परिणाम सहकारी चळवळीवर होत आहे .

१२) काही संस्थांमधील पदाधिकारी व अधिकारी, कर्मचारी वर्ग यांच्याकडून सभासदांची पिळवणूक होत आहे.

१३) खर्चामध्ये काटकसरीचा अभाव काही सहकारी संस्थांमध्ये आढळतो. प्रभावी व्यवस्थापनाचाही अभाव काही ठिकाणी लक्षात येतो.

१४) अकार्यक्षम व्यवस्थापन, राजकीय हस्तक्षेप , थकबाकीचे वाढते प्रमाण , पदाधिकारी - नातेवाईक हितसंबंध , वाढती थकबाकी यामुळे मोठ्या प्रमाणावर संस्था तोट्यामध्ये चालत आहे .

## आंतरराष्ट्रीय सहकार संघटना (International Co - operative Alliance)

### अर्थ

आंतरराष्ट्रीय पातळीवरही सहकाराला प्रेरणा मिळावी तसेच संघाचा विकास होऊन याला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त व्हावा , आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यासपीठ उपलब्ध व्हावे या भावनेतून आंतरराष्ट्रीय पातळीवरील आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना स्थापन करण्यासाठी १८८६ मध्ये प्रयत्न झाले . फ्रान्समधील सहकाराचे तज्ञ येडोर बॉयव्हक यांनी याविषयी संकल्पना मांडण्यास सुरूवात केली. पुढे इंग्लंडसह अनेक देशातील सहकारी संस्थांनी यादृष्टीने प्रयत्न सुरू केले. १८९५ मध्ये इंग्लंड मधील लंडन शहरात आंतरराष्ट्रीय सहकार काँग्रेसचे महाअधिवेशन झाले. याच अधिवेशनात आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची (ICA) स्थापना करण्यात आली . या संघटनेच्या माध्यमातून जगातील सहकारी संस्थांचे प्रश्न सोडवले जातात व त्या प्रश्नावर अभ्यास केला जातो. सहकाराविषयी मार्गदर्शन केले जाते. "आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना म्हणजे जगातील अनेक देशातील सहकारी संस्थांनी एकत्रित येऊन स्थापन केलेला महासंघ होय."

## आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे उद्देश

१) सहकारी संस्थांच्या तत्वांचे पालन करणाऱ्या सर्व सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणे .( आंतरराष्ट्रीय पातळीवर )

२) संपूर्ण जगामध्ये सहकाराचा प्रचार व प्रसार करणे तसेच सहकार तत्वे व पध्दतीचा प्रसार करणे.

३) सहकार चळवळीचे हित संवर्धन करणे .

४) आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेशी संलग्न झालेल्या सहकारी संघात चांगले व सौहदार्यपूर्ण संबंध निर्माण करणे .

५) आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकारी संघटनांचे मित्रत्वाचे संबंध निर्माण करणे .

६) सहकाराच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर शांतता व सुरक्षितता निर्माण करणे .

७) आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी चळवळीमध्ये सुसंवाद साधताना येणारे अडथळे दूर करणे .
८) राजकीय व इतर संस्थाविषयी तटस्थ राहणे .
९) सहकार चळवळीच्या साहाय्याने एक सशक्त व प्रगतीशील अर्थव्यवस्था निर्माण करणे .

## आंतरराष्ट्रीय सहकार संघ समिती आढावा ( १९३७ , १९६६ , १९९५ )

आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने सहकार तत्वांचा आढावा घेणेसाठी १९३७ , १९६६ , १९९५ मध्ये समित्या स्थापन केल्या आहेत .

**अ) आंतरराष्ट्रीय सहकार संघ समिती १९३७**

१९३७ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या सहकारी चळवळीच्या तत्वांचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन केली होती. या समितीने खालील चार तत्वे निश्चित केली होती .

१ ) सहकारात खुले सभासदत्व असावे .
२ ) सहकारी संस्थांवर / चळवळींवर लोकशाही मार्गाने नियंत्रण असावे .
३ ) व्यवसायानुसार लाभांश दिला जावा / नफ्याचे वाटप करावे .
४ ) भांडवलावर मर्यादित व्याज द्यावे .

**ब) आंतरराष्ट्रीय सहकार संघ समिती १९६६**

प्रा . डी . जी . कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती कार्यरत होती. यामध्ये अमेरिका , इंग्लंड , रशिया , जर्मनी या देशाचे प्रतिनिधी सदस्य म्हणून कार्यरत होते. प्रा. कर्वे यांच्या नेतृत्वाखालील समितीने विविध देशातील सहकारी संस्था व चळवळीचा अभ्यास केला व त्यानुसार या समितीने सहकाराची आठ तत्वे निश्चित केली.

१) काटकसरीचे तत्व
२) सेवाविषयक तत्व
३) समता तत्व
४) प्रसिध्दी तत्व
५) मानवसेवेचे तत्व
६) सामाजिक मालमत्ता तत्व
७) बंधुभावाचे तत्व
८) स्थानिक स्वायत्ता तत्व

**क) आंतरराष्ट्रीय सहकार संघ समिती १९९५**

ब्रिटीश कोलबिश्स विद्यापीठाचे डीन डॉ . इयॉन मॅकफरसन यांच्या अध्यक्षतेखाली एक गट आंतरराष्ट्रीय सहकार संघाने स्थापन केला . या गटाच्या समितीने सहकार क्षेत्र व बदलती जागतिक परिस्थिती, जागतिकीकरणाची सुरुवात याचा विचार करून अभ्यासाअंती सहकारविषयक तत्वे निश्चित केली (शिफारस केले).

१) सभासदांना खुले किंवा ऐच्छिक सभासदत्व असावे .
२) व्यक्ती हितापेक्षा सामुहिक हितास प्राधान्य असावे.

३) सभासदाला त्याच्या इच्छेनुसार संस्थेतून बाहेर पडता यावे .
४) लोकशाही मार्गाने सहकार चळवळीवर नियंत्रण .
५) नफ्याची न्याय वाटणी व्हावी .
६) सहकारामध्ये उद्योगाचा समावेश (सहकारी तत्वावरील ) करून बाजाराच्या आधारे वस्तू व सेवांचे आदान प्रदान व्हावे .
७) सहकारी संस्थांमधील सभासदांनी लोकशाही मार्गाने निर्णय घ्यावेत.

## सहकार क्षेत्रातील समस्या

१) निष्क्रीय सहकारी संस्था / आर्थिक डबघाईस जाणाऱ्या संस्था यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे .
२) सहकारी संस्थांच्या बुडीज कर्जाचे प्रमाण वाढत आहे .
३) वैद्यनाथन समितीच्या शिफारशींची प्रत्यक्षात अंमलबजावणी १०० % होताना दिसत नाही .
४) भारतातील अनेक सहकारी संस्थांकडे स्वतःचा आर्थिक निधी पुरेसा नाही , त्यामुळे त्यांना इतर वरीष्ठ संस्थाकडून कर्जपुरवठा घ्यावा लागतो . उदा . जिल्हा मध्यवर्ती सह . बँका राज्य सह . बँक / नाबार्ड कडून कर्ज घेतात .
५) सहकार क्षेत्रात दिवसेंदिवस राजकीय व्यक्ती व सरकार यांचा विनाकारण हस्तक्षेप वाढत आहे .
६) काही सहकारी संस्थांचे पदाधिकारी अधिकारी व कर्मचारी यांच्या साहाय्याने / त्यांच्यावर राजकीय दबाव टाकून आर्थिक गैरव्यवहार करतात .
७) सहकारी संस्थांच्या विकासासाठी पाहिजे त्याप्रमाणात राजकीय इच्छा शक्तीचा अभाव आढळतो.
८) सक्षम व्यवस्थापन व प्रशासन ही देखील काही अंशी समस्या आहे .
९) कर्जमाफीमुळे सभासदांची भावना कर्जफेड करण्याची राहत नाही .
१०) सरकारी धोरण व जागतिकीकरणामुळे झालेले बदल यामुळे ही देखील सहकार चळवळ अडचणीत सापडली आहे .
११) बिगर उत्पादक संपत्ती ( एन.पी.ए. ) अनेक संस्थांचा वाढताना दिसत आहे .
१२) सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी वर्गास नोकरी विषयक / सेवा विषयक सुविधा पाहिजे त्याप्रमाणात मिळत नाही .
१३) सरकारी धोरणामध्ये धरसोड वृत्ती किंवा स्पष्ट धोरण नसल्याने सहकारी संस्थांना कामकाज करणे अवघड जाते . उदा . कर्जमाफी विषयी वेगवेगळे जी.आर. व ऑनलाईन माहितीतील सततचा बदल .

## सहकारी क्षेत्रातील आव्हाने

१) सहकारी संस्थांची आर्थिक घडी विस्कटीत झाल्याने अनेक सहकारी संस्था बंद पडल्या आहेत.

२) काही सहकारी संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याने ठेवीदारांच्या ठेवी असुरक्षित होताना दिसत आहे.

३) सहकाराच्या मूळ तत्वावरच घाला घालण्याचे काम सरकारी यंत्रणाकडून होत आहे.

४) सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणात राजकीय हस्तक्षेप वाढत चालला आहे.

५) २०१६ मधील नोटाबंदीचा परिणाम राष्ट्रीयकृत बँकाप्रमाणे सहकारी बँका व संस्थांवर झालेला आहे.

६) सहकारी संस्थांमधील उत्पादकता काही प्रमाणात का होईना कमी झाल्याने सरकारी मदतीमुळे राजकीय हस्तक्षेप वाढतच आहे.

७) सहकार कायद्यात २०१२ मध्ये ९७ वी घटना दुरूस्ती करून केलेल्या बदलांमुळे ही काही आव्हाने निर्माण झाली आहे.

८) काही संस्था ठराविक मुदतीमध्ये आर्थिक हिशोबांच्या कागदपत्रांचे लेखापरीक्षण करत नसल्याचे लक्षात येते.

९) व्यावसायिक पध्दतीने सहकारी संस्थांचे व्यवस्थापन सुरू करणे गरज बनत चालली आहे.

१०) एन.पी.ए.चे प्रमाण कमीत कमी कसे राहील असे आव्हान निर्माण झाले आहे.

११) सहकारी संस्थांची कर्जाची वाढती थकबाकी आव्हान आहे .

१२) जागतिकीकरणास सामोरे जाणे एक आव्हान आहे.

---

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ.धीरज झाल्टे व इतर, सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती(२०२०), प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.

२) प्रा.नंदा लहाडे, सहकार (२०१३), आयडॉल पब्लिकेशन, पुणे.

३) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास क्रम संशोधन मंडळ ,पुणे : सहकार

४) तापकीर मुकुंद व साबळे आर.जे. (२००५), सहकार ,निराली प्रकाशन ,पुणे

५) डॉ. आर के दातीर (२००९) ‘भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार , निराली प्रकाशन,पुणे

६) जोशी सी जे (१९८६ ), सहकार , फडके प्रकाशन, कोल्हापूर